# – शिक्षणविषयक तत्त्वज्ञान –

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

## शिक्षणविषयक तत्त्वज्ञान

शिक्षण - व्यक्तीच्या बौध्दिक, मानसिक आणि सांस्कृतिक विकासाला कारण होणारे ज्ञान ते शिक्षण होय, अशी शिक्षण शब्दाची व्यापक अर्थाने व्याख्या करता येईल. एखादी व्यक्ती विद्यार्थी दशेत गुरुकडून जे ज्ञान मिळवते, ते शिक्षण होय, अशी शिक्षणाचो संकुचित अर्थाने व्याख्या होईल. तसे पाहिले तर मनुष्य जन्मभर विद्यार्थीच असतो. कारण तो जन्मभर शिक्षण घेतच असतो. वाढत्या वयाबरोबर येणाऱ्या अनुभवातून आणि आजूबाजूला घडणाऱ्या घटनांच्या निरीक्षणाने, तसेच ग्रंथ व वृत्तपत्रे वाचून माणसाच्या ज्ञानात सतत भर पडत असते. शिक्षणामुळे माणसाला जीवनांत यशस्वी वाटचाल करता येते. एक माणूस दुसऱ्या माणसापेक्षा श्रेष्ठ ठरतो तो त्याला त्याच्यापेक्षा एखादा जास्त अवयव असतो म्हणून नव्हे, तर मन आणि बुध्दी ही शिक्षणाने प्रगत व विकसित झालेली असतात म्हणून होय. [भारतीय संस्कृतिकोश - पं. महादेवशास्त्री जोशी]

शिक्षणविषयक मांडलेल्या वरील विचारातून एक गोष्ट निश्चितपणे सिध्द होते, ती म्हणजे व्यक्तीचा सर्वांगीण विकास शिक्षणाने झाला पाहिजे. तिची व्यावहारीक त्याचप्रमाणे आध्यात्मिक उन्नतीही शिक्षणाने साधली पाहिजे. तेव्हा अशा प्रकारचे संस्कार घडविणारे जे ते म्हणजे शिक्षण. या दृष्टीने आजच्या शिक्षणपध्दतीकडे पाहतां व्यक्तीची सर्वांगीण प्रगति होते कां ? तर दुर्दैवाने नाही, असेच म्हणावे लागेल. कारण आजच्या जगांत आपण उघड्या डोळ्यांनी आजुबाजूला पाहिले असतां, रोजच्या वर्तमानपत्रावर नुसती नजर फिरवली असतां, आपल्या नजरेत चट्कन भरतात त्या खून, दरोडे, बलात्कार, भ्रष्टाचार इ. संबंधीच्या बातम्या, आणि सगळीकडे माजलेली अंदाधुंदी. याचे कारण आपण शोधूं लागलो असतां आपल्याला कळून येते की, आजची शिक्षणपध्दती तांत्रिक विद्येवर भर देणारी

आहे, भौतिक सुखसोयींच्या मागे लागलेली आहे. व्यक्तीला सुसंस्कारित बनविणारी ती नाही. तशी जर ती असती तर आताचे समाजाचे चित्र पालटलेले दिसले असते. सुसंस्कारांचा अभाव हेच या सर्व परिस्थितीचे मुख्य कारण आहे. शिक्षण हे माणसाला नुसतेच सुशिक्षित बनवत नाही, तर ते माणसाला विचारी बनवते. त्याची विवेकबुध्दी जागृत करुन चांगल्या वाईटाचे ज्ञान त्याला करुन देते. या बाबतीत महाकवि कालिदासाचे मतही लक्षांत घेण्यासारखे आहे. तो म्हणतो -

" सम्यगाराधिता विद्या प्रबोधविनयाविव ।" रघु. १०/७१

म्हणजे "चांगल्या रीतीने अभ्यासलेली विद्या ज्याप्रमाणे शहाणपण व विनय यांना जन्म देते" [त्याप्रमाणे सुमित्रा लक्ष्मण व शत्रुघ्न या जुळया मुलांना जन्म देती झाली. ] कालिदासाने या श्लोकार्धातच आपला शिक्षणासंबंधीचा उद्देश स्पष्ट केला आहे. त्याच्या मते चांगले शिक्षण [अभ्यासलेले] हे नम्रपणा शिकवते, उध्दटपणा नाही, शहाणपणा शिकवते, भ्रष्टाचार नाही. सुमारे २००० वर्षांपूर्वी कालिदासाने मानलेला शिक्षण-संबंधीचा उद्देश आज खरोखर विचाराला प्रवृत्त करणारा आहे.

प्राचीन भारतीय लोकांनी त्यांच्या काळाला अनुसरुन शिक्षणाचे कांही उद्देश मानलेले आहेत. विद्यार्थ्यांच्या मनांत पावित्र्य आणि धार्मिकता यांची भावना निर्माण करणे, चारित्र्य संवर्धन करणे, त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास करणे, त्यांना सामाजिक जबाबदारीची आणि कर्तव्यांची जाणीव करुन देणे, तसेच राष्ट्रीय संस्कृतीची वृध्दी व प्रसार करणे, हे शिक्षणाचे मुख्य उद्देश प्राचीन आचार्यांनी मानले. [भारतीय संस्कृतिकोश - पं. महादेवशास्त्री जोशी] या सर्व उद्देशांची आजच्या समाजाला आणि शिक्षणपध्दतीला आत्यंतिक गरज आहे.

असे शिक्षण जर विद्यार्थ्याला मिळावयाचे असेल तर, देशाचा एक आदर्श नागरिक त्याला बनवावयाचे असेल तर, त्याला बदलणाऱ्या शिक्षण-

पध्दतीबरोबरच गरज आहे ती तळमळीच्या शिक्षकांची आणि कष्टाळू विद्यार्थ्यांची.

भारतीय शिक्षणपध्दतीत गुरूला असाधारण महत्त्व दिलेले आहे.

गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णुर्गुरुर्देवो महेश्वर: ।
गुरु: साक्षात् परब्रह्म तस्मै श्रीगुरवे नम: ।।

म्हणजे "गुरु हा ब्रह्मा, विष्णु आणि महेश्वर आहे. तो साक्षात् परब्रह्म आहे, त्या श्रीगुरूला माझा नमस्कार असो" असा त्याचा महिमाही गायिला आहे. पिता हा पुत्राला केवळ जन्म देतो, तर गुरु त्याची जन्ममरणाच्या फेऱ्यातून सुटका करतो, म्हणून पित्यापेक्षाही गुरूला श्रेष्ठ मानले आहे. गुरु हा शिष्याचा आध्यात्मिक पिता होय, ही कल्पना अथर्ववेद, सूत्रे, स्मृतिग्रंथ या सर्व ठिकाणी आढळते. अज्ञान अंधकारातून ज्ञानप्रकाशांत नेणारा म्हणून त्याचे महत्त्व मानले आहे. गुरूच्या कांही व्याख्याच त्याच्या कार्याची महती सांगणाऱ्या आहेत.

"गिरत्यज्ञानमिति" = अज्ञान दूर करतो तो.
"गृणाति धर्ममिति" = धर्माचा उपदेश करतो तो.
गीयते इति = ज्याचे स्तवन केले जाते तो.

तसेच गुरु :- गकार: सिध्दिद:प्रोक्त रेफ पापस्य हारक: ।
उकारो विष्णुरव्यक्तस्त्रितयात्मा गुरु: पर: ।। -आगमसार

गुरुवाचून ज्ञान मिळत नाही असे छांदोग्य उपनिषद सांगते. [६.१४.२] हे गुरुचे महत्त्व लक्षांत घेऊनच एकलव्याला जेव्हा द्रोणाने शिष्य म्हणून स्वीकारणे नाकारले, तेव्हां त्याने द्रोणाचार्यांची मृण्मयमूर्ती करून तिच्या सानिध्यांत धनुर्विद्या प्राप्त करून घेतली. [म.भा.आदि.१३२]

कालिदासाचीही शिक्षकाबद्दलची मते इतकीच उदात्त आहेत. तो पुढील श्लोकांत "अज्ञानरूपी अंधकार दूर करून ज्ञानरूपी प्रकाश देणाऱ्या सूर्याची उपमा त्याला देतो." तो म्हणतो - "यतस्त्वया ज्ञानमशेषप्राप्तं

लोकेन चैतन्यमिवोष्णरश्मेः" म्हणजे "अज्ञानाचा नाश करून मनुष्याला नवीन दृष्टी देणाऱ्या शिक्षकाला, रात्रीचा अंधःकार दूर करून संपूर्ण विश्वांत चैतन्य उत्पन्न करणारा सूर्य" असे कालिदास म्हणतो.

शिक्षकाच्या पवित्र कार्याचे नेमके मर्मच कवी या श्लोकांत सांगतो. त्याच्या या मर्मज्ञवृत्तीमुळेच त्याला "तत्त्वज्ञ कालिदास" म्हणणे सयुक्तिक होईल.

तेव्हा असे हे ज्ञानदानाचे पवित्र कार्य करणारा, देशाचे समर्थ आधारस्तंभ बनवणारा शिक्षक हा तळमळीचा हवा. स्वतःचे तन, मन, धन या पवित्र कार्यासाठी वेचणारा हवा. स्वतःच्या केवळ उदरनिर्वाहासाठी ज्ञानाचा विक्रय करणारा शिक्षक हा राष्ट्राचे फार मोठे नुकसान करत असतो. अशा शिक्षकाला कालिदासाने दिलेली व्यापाऱ्याची उपमा अत्यंत सार्थ होय. आपल्या "मालविकाग्निमित्रम्" या नाटकांत हरदत्त आणि गणदास या २ नृत्यशिक्षकांच्याद्वारा त्याने आपले शिक्षणविषयक कांही विचार मांडले आहेत. त्यामध्ये अशा ज्ञानविक्रय करणाऱ्या शिक्षकांच्या बाबतीत तो म्हणतो -

लब्धास्पदोऽस्मीति विवादभीरो -<br>
स्तितिक्षमाणस्य परेण निन्दाम् ।<br>
यस्यागमः केवलजिविकायै<br>
तं ज्ञानपण्यं वणिजं वदन्ति ॥ मालविका. १/१७

- "मला पद मिळाले आहे म्हणून विवादाला घाबरणाऱ्या, दुसऱ्याकडून होणारी निंदा सहन करणाऱ्या, ज्याची विद्या ही केवळ पोट भरण्याचे साधन आहे त्याला ज्ञानरूपी मालाचा व्यापारी म्हणतात". ज्याप्रमाणे व्यापारी हा फक्त प्रत्येक बाबतीत स्वतःचा फायदा बघतो, इतर गोष्टींशी त्याचे कांही कर्तव्य नसते. त्याचप्रमाणे असा शिक्षक हा फक्त स्वतःचा स्वार्थ पाहतो. आणि एकवेळ इतर बाबतीत हा स्वार्थी विचार, ही व्यापारी वृत्ती ही क्षम्य होय पण शिक्षणासारख्या पवित्र कार्यात ही वृत्ती अत्यंत

घातक होय. कारण ही वृत्ती यामुळे राष्ट्राचे फार मोठे नुकसान करीत असते. "शिक्षक हा कसा नसावा" हेच कालिदासाने याठिकाणी सांगितले आहे. शिक्षक हा एक पेशा किंवा व्यवसाय नसून ते एक ज्ञानदानाचे पवित्र कार्य आहे.त्यामध्ये शुष्कपणे चालणाऱ्या मालाच्या देवाणघेवाणीप्रमाणे ज्ञानाची देवाणघेवाण बरोबर नाही. राष्ट्राचे समर्थ आधारस्तंभ आपण तयार करत आहोत या जबाबदारीच्या जाणीवेने अत्यन्त तळमळीने, नि:स्वार्थीपणाने, प्रामाणिकपणाने,मन:पूर्वक शिक्षकांनी हे कार्य केले पाहिजे. एवढा गहन अर्थ "व्यापारी" या शब्दामध्ये सामावलेला आहे. याठिकाणी अशा शिक्षकाला दिलेली "व्यापाऱ्याची" उपमा अत्यंत अचूक होय. "उपमा कालिदासस्य" म्हणून कालिदासाला गौरविले जाते ते अशा नेमक्यां दिलेल्या उपमांच्यामुळेच. ज्ञानदानाच्या कार्याचे नेमके तत्त्वच या श्लोकातून कालिदासाने स्पष्ट केले आहे. म्हणूनच त्याला "तत्त्वज्ञ" हे विशेषण योग्य होय.

याच बरोबर आणखी एक महत्त्वाचा विचार कालिदासाने या श्लोकात मांडलेला आहे, तो म्हणजे शिक्षकाने स्वत:च्या बुध्दिमत्तेवर, स्वत:च्या कर्तृत्वावर कोणतेही पद प्राप्त केले पाहिजे.अशा पध्दतीने जो वरचे पद प्राप्त करून घेतो तोच सर्व बौध्दिक कसोटयांत यशस्वी होतो. होणाऱ्या टीकेला तो [यशस्वीपणे] समर्थपणे तोंड देतो. कारण बुध्दिमत्तेच्या जोरावर त्याला ते पद मिळालेले असते, वशिल्याने नव्हे. अशा प्रकारे वशिल्याने पद प्राप्त केलेल्या व्यक्ती पाहिजे ती गोष्ट मिळाल्यामुळे वाद टाळतात, आणि लोकांनी केलेली निंदा ही निमूटपणे सहन करतात. कारण विरोध केला तर पद जाण्याची भीति त्यांना असते. अशाही शिक्षकांच्या नेमक्या वर्मावर कालिदासाने बोट ठेवले आहे.

या नाटकांतच "उत्तम शिक्षका"ची कालिदासाने केलेली व्याख्या ही ही लक्षांत ठेवण्यासारखी आहे. तो म्हणतो -

श्लिष्टा क्रिया कस्यचिदात्मसंस्था
सङ्क्रान्तिरन्यस्य विशेषयुक्ता ।
यस्योभयं साधु स शिक्षकाणां
धुरि प्रतिष्ठापयितव्य एव ।। [मालविका १/१६] – परिव्राजिका

– "कोणाचा स्वत: केलेला अभिनय उत्कृष्ट असतो, तर दुस-या एखाद्याला [स्वत:चे कौशल्य] तो शिष्याच्या ठिकाणी बठविणे जास्त साधलेले असते. ज्याच्या ठिकाणी दोन्ही गोष्टी चांगल्या तोच शिक्षकांच्या नेतृपदी स्थापण्यास योग्य होय." कालिदासाच्या मते स्वत: बुध्दिमान व ज्ञानी असणे ही शिक्षकाची एक बाजू होय व शिष्याला ते ज्ञान उत्तमप्रकारे देणे ही दुसरी बाजू होय. शिकविणे ही एक कला आहे. ती सर्वांनाच जमेल असे सांगता येत नाही. कारण "सुशिक्षितोऽपि सर्व उपदेशदर्शने न निपुणो भवति । –" म्हणजे "शिकून देखील कांही शिक्षक स्वत: बुध्दिमान असूनसुध्दा सर्वजण शिकवण्याचे प्रात्यक्षिक दाखविण्यात कुशल नसतात." [मालविका अंक १/विदूषक]. दिलेली विद्या शिष्याला समजत नसेल तर "शिक्षक" म्हणवून घेण्यास ती व्यक्ती अयोग्य होय. म्हणजेच शिष्यांना नीटसे समजेल, उमजेल अशा प्रकारे शिकविणे ही एक कलाच आहे, आणि ती उत्तम शिक्षकाजवळ असलीच पाहिजे. दुसरी गोष्ट म्हणजे कांही शिक्षक असे असतात कीं जे उत्तम शिकवतात, परंतु ते स्वत: फारसे बुध्दिमान नसतात. अशा ही व्यक्तींना उत्तम शिक्षक म्हणणे अयोग्य होय. कारण स्वत:च्या तुटपुंज्या ज्ञानावर तो शिक्षक आपल्या शिष्याला कसा काय ज्ञानी बनविणार ? तेव्हां ज्याच्याजवळ या दोन्ही गोष्टी आहेत, म्हणजे जो स्वत: बुध्दिमान आहे व शिकवण्याची कला ही जो जाणतो तोच शिक्षकाच्या नेतृपदी स्थापण्यास योग्य होय, असे कालिदासाचे मत आहे.

विद्वत्ता आणि उत्तम शिकवण्याची कला याचबरोबर शिक्षकाची परीक्षा आणखी एका गोष्टीने होते ती म्हणजे शिष्याची निवड. याबाबतीत

आपले विचार व्यक्त करतांना *B.S.Upadhyaya* आपल्या *India in Kalidas* या पुस्तकात म्हणतात. -

*The choice and intiation of an intelligent pupil reflected credit on the part of the teacher, and it was supposed that the degree of success of a teacher much depended upon the proportion in which his pupil was slow or intelligent to receive his teaching, otherwise the skill of the teacher had chances of being wasted in the manner of an article placed in a utensil of bad matel and consequently no discredit was attached by a section of thinkers to those teachers who had by chance initiated slow pupils. Neverthe less, it was contended that the method of teaching on the part of a teacher should be so excellent as to turn even a dull pupil into an intelligent one and make him fully receive the secret of his lore. The excellence of his art must not be affected by the dullness. of his pupil just as god remains unimpaired even when tested in fire. In fact the capacity of the pupil to receive and absorb his teacher's teaching was supposed to grow in proportion to the samskaras of his earlier birth. It was the previous sanskaras that determined a pupil's dullness or intelligence. Thus it is evident that theories regarding types of students differed as they do now. (Book VI - Education and Learning - Chapter XVI)*

शिक्षक अत्यंत विद्वान असेल, शिकवण्याची कलाही तो उत्तम जाणत असेल, पण शिष्यच जर मंदबुध्दीचा असेल व त्याची ग्रहणशक्ति कमी असेल तर गुरुच्या शिकवण्याचे खरे चीज तो करु शकणार नाही, आणि त्यामुळे शिक्षकाचा वेळ आणि श्रम हे वाया जातील. यामुळे अत्यंत बुध्दिमान, कष्टाळु, जिज्ञासु असा शिष्य शिक्षकाने निवडला पाहिजे. अशा शिष्याला दिलेली विद्याच सत्कारणी लागते. याबाबतीत कालिदासाने दिलेली उपमा अतिशय सुंदर आहे. तो म्हणतो -

पात्रविशेषे न्यस्तं गुणान्तरं व्रजति शिल्पमाधातुः ।
जलमिव समुद्रशुक्तौ मुक्ताफलतां पयोदस्य ।। मालविका. अंक १/६

- "समुद्रातील शिंपल्यात पडलेल्या ढगाच्या पाण्याचे मोती [होतात] तसेच गुरुची उत्कृष्ट शिष्याला दिलेली कला आगळेच नैपुण्य धारण करते." [गणदास]

कोणत्याही गोष्टीचे साफल्य तेव्हाच होते जेव्हॉ ती गोष्ट सत्पात्री केली जाते. ज्याप्रमाणे दान हे सत्पात्री द्यावं त्याप्रमाणेच विद्या सुध्दा सत्पात्री, उत्कृष्ट शिष्यालाच द्यावी असे कालिदास याठिकाणि सांगतो. कारण

सुशिष्यपरिदत्ता विद्येवाशोचनीयासि संवृत्ता ।=" अभि.शा. अंक ४

- "सत्पात्र शिष्याला दिलेल्या विद्येबद्दल वाईट वाटत नाही." ज्याप्रमाणे एकच पावसाचे पाणी पण ते भिन्न भिन्न ठिकाणी पडले असतां भिन्न भिन्न स्वरुप धारण करते. ज्याप्रमाणे ते खडकावर पडले तर वाहून जाते, जमिनीवर पडले तर मुरते, नदीत पडले तर लोकांच्या उपयोगी पडते व शिंपल्यात पडले तर मोत्याचे सुंदर रुप ते धारण करते, त्याप्रमाणे शिक्षकांनी दिलेले ज्ञान मंदबुध्दीचा विसरुन जाईल, दुर्जन शिष्य त्याचा वाईट कामासाठी उपयोग करेल व चांगला, सच्छिल व बुध्दिमान शिष्य ती विद्या सत्कारणी लावेल, स्वतःच्या व देशाच्या उन्नतीकरतां त्याचा

उपयोग करेल. तेव्हा असा योग्य, उत्कृष्ठ शिष्य निवडण्यांतच शिक्षकाची खरी परीक्षा होते असे कालिदासाला वाटते. म्हणून -

विनेतुरद्रव्यपरिग्रहोऽपि बुध्दिलाघवं प्रकाशयति । मालविका १

- "अयोग्य शिष्याचा स्वीकारच शिक्षकाचे बुध्दिदारिद्र्य व्यक्त करतो". असे गणदास म्हणतो. म्हणूनच प्राचीन काळी गुरु प्रथम शिष्यांची परीक्षा घ्यावयाचे व जो शिष्य परीक्षेत उत्तीर्ण होईल त्यालाच आपली विद्या द्यावयाचे.

कालिदास प्रत्येक बाबतीत आपली मते किती विचारपूर्वक मांडत असे हेच यावरून दिसून येते. कोणत्याही गोष्टीचा सखोल विचार करणे आणि त्यातून कांहीतरी निष्कर्ष शोधून काढणे हे कालिदासाचे एक वैशिष्टय आहे. हे त्याचे निष्कर्ष तो सुभाषितरूपाने मांडून ठेवतो. आणि सुभाषितेही कधीच असत्य ठरत नाहीत. म्हणूनच कालिदासाचे सुभाषित-रूपाने मांडलेले हे सर्व विचार त्याच्या काळांत म्हणजे सुमारे २००० वर्षापूर्वी जितके सत्य होते तितकेच ते आजही सत्य आहेत आणि पुढेही राहतील.

आश्रमात घेतांना विद्यार्थ्यांच्या शीलाची नीट चौकशी करीत. जो वर्तनाने शुध्द, बुध्दीने चलाख, कामात प्रमाद न करणारा व ब्रह्मचर्याने युक्त असेल त्यालाच विद्यादान करावे म्हणजे ती विद्या वीर्यवती राहते, असे यास्काचार्यांनी निरुक्तात व मनुस्मृतीत म्हटले आहे. -
[कालिदास - कै. वा. वि. मिराशी, प्रकरण -"कालिदासीय विचार-शिक्षण पा. नं. २८०]

प्राचीन काळी आजच्याप्रमाणे विद्या ही सहजसाध्य नव्हती. त्यासाठी शिष्यामध्ये फार मोठया कष्टाळु वृत्तीची आवश्यकता असे. शिष्याला फार मोठे योगदान करावे लागे. पूर्वी शिक्षण घेण्यासाठी शिष्याला घरदार सोडून, आपल्या प्रेमाच्या व्यक्तींना सोडून, आश्रमात जाऊन राहावे लागे. कांही श्रीमंत लोक आपल्या पुत्रांना शिकविण्यासाठी

शिक्षकांची घरी नेमणूक करीत ती गोष्ट वेगळी. ज्याप्रमाणे हरदत्त आणि गणदास या २ नृत्यशिक्षकांना नृत्य शिकवण्यासाठी अग्निमित्राने नेमले होते. पण सर्वसामान्य विद्यार्थ्यांस शिक्षण हे आश्रमांतच घ्यावे लागे. तेथील जीवनक्रम अत्यंत साधा असे. म्हणजे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा यासाठीं लहानपणापासून त्यांना कष्टाचीहीं सवय गुरु लावीत असत. त्यांना रहायला वृक्षपर्णांनी तयार केलेली पर्णशाळा, नेसण्यास वल्कले, भोजनास अकृष्टरोहि म्हणजे जमीन नांगरल्याशिवाय उगवणाऱ्या नीवार धान्याचे पदार्थ, वन्य फळे, कंदमुळे, निजण्यास दर्भाची शय्या किंवा हरिणचर्म असे. [रघु. १९, ५, १४, ८१]. रात्री दिव्याकरितां इंगुदी [हिंगणबेटा]च्या तेलाचा उपयोग करीत. जखमेवर औषध म्हणूनही त्याचा उपयोग होत असे. [शाकु. ४, १४]. पश्चिमाद्यामिनीयामात्प्रसादमिव चेतना" [रघु. १७, १०] म्हटल्याप्रमाणे पहाटेच्यावेळी बुध्दी प्रसन्न राहते म्हणून पहाटे उठून विद्यार्थी अध्ययनास लागत. सकाळी व संध्याकाळी समिधा, कुश, फळे वगैरे आणण्याकरितां तपस्वी व विद्यार्थी तपोवनांबाहेर जात असत. स्त्रियांना व विद्यार्थिनींना जवळपासच्या नदीतून किंवा पाणवठयावरुन गृहकृत्याकरितां किंवा झाडास घालण्याकरितां पाणी आणावे लागे. सकाळी व सायंकाळी अग्नीची पूजा व होम होत असत. [रघु. १. ५३] [कालिदास - वा. वि. मिराशी, प्रकरण ८-कालिदासीय विचार [शिक्षण] - आश्रमांतील जीवनक्रम, पा. नं. २८०-८१]

तेव्हा अशा प्रकारे कष्ट सहन करण्याची सवय, स्वावलंबी बनण्याची सवय शिक्षक लहानपणापासून शिष्यांना लावत. तेव्हां आपल्या या सर्व जीवनपध्दतीला पचवेल अशाच शिष्य ते अनेक प्रकारे शिष्याची परीक्षा घेऊन निवडत.

शिष्य निवडण्याच्या बाबतीत शिक्षकाने चोखंदळ असावे ही गोष्ट कालिदासाने अनेक ठिकाणी उल्लेखिली आहे. "रघुवंशामध्ये" कुमार रघुला शिकवण्यासाठी नेमलेल्या सर्व विद्यागुरुंचे प्रयत्न - रघु बुध्दिमान असल्याने

SARR. BAL... ...ARDEKAR LIBRARY
SHIVAJ... ...KOLHAPUR

सहज सफल झाले असे सांगताना कालिदास म्हणतो -

"क्रिया हि वस्तुपहिता प्रसीदति ।  [रघु. ३.२९]

- "गुरुचे शिक्षण योग्य शिष्याला दिलेले असेल तरच सफल होते." यापूर्वी-चाही रघुवंशातील श्लोक याच संदर्भात आलेला आहे. त्यामध्येही कालिदासाने असे वर्णन केले आहे की, रघुचे मौंजीबंधन विधियुक्त केल्यावर पुढे विद्यावंत, गुरु, प्रिया यांनी संपूर्ण विद्या आणि कला शिकविली. त्या गुरुंचे थोडेही श्रम रघुला शिकविण्याचे बाबतीत फुकट गेले नाहीत. याचे तात्पर्य कालिदासाने असे काढले आहे कीं, शिष्यानुसारच शिक्षकाचे सफलत्व या जगांत अवलंबून असते. गणदास आणि हरदत्त हे बुध्दिमत्तेच्या बाबतीत तुल्यबल म्हणूनच परस्परांशी स्पर्धा करीत असल्याने याही बाबतीत कालिदास एक विधान करतो कीं -

प्राय: समानविद्या:
परस्परयश:पुरोभागा: ।। मालविका अंक १/२०

- म्हणजे "विद्येत सारखे असलेले लोक बहुधा परस्परांच्या कीर्तीचा हेवा करतात." ही गोष्ट आजही जगामध्ये आपल्याला पहावयास मिळते.

शिक्षणाच्या बाबतीत ज्या दोन घटकांच्याशिवाय शिक्षण पूर्णच होऊ शकत नाही. ते दोन घटक म्हणजे गुरु आणि शिष्य. अलिकडच्या भाषेत सांगावयाचे झाल्यास शिक्षक आणि विद्यार्थी. विविध संदर्भात शिक्षकांविषयीचे आपले विचार व्यक्त केल्यानंतर विद्यार्थ्यांच्या संदर्भातही कालिदासाने आपली कांही मते स्पष्टपणे मांडलेली आहेत. यामध्ये विद्यार्थ्यांची परीक्षा घेण्याच्या संदर्भात त्याने म्हटले आहे की,

"तदपरिनिष्ठितस्योपदेशस्यान्याय्यं प्रदर्शनम् ।  [माल. १]

- म्हणजे "खोलवर न रुजलेल्या शिकवणीचे प्रदर्शन अयोग्य होय." म्हणजे समाधानकारकरीत्या अभ्यास पूर्ण झाल्यानंतरच विद्यार्थ्यांनी परीक्षेस बसावे. म्हणजे परीक्षा कितीही कठीण असो वा परीक्षक कितीही कडक

असो, विद्यार्थी परीक्षेत उत्तीर्ण झाल्याशिवाय राहात नाही. कारण कालिदास म्हणतो, एखादी व्यक्ती कितीही ज्ञानी झाली तरी ती स्वत:च्या बाबतीत साशंक असते.

आपरितोषाद्विदुषां न साधु मन्ये प्रयोगविज्ञानम् ।
बलवदपि शिक्षितानामात्मन्यप्रत्ययं चेत: ।। अभि. शा. अंक १/१

- म्हणजे "पंडितांचं समाधान होईपर्यंत अभिनय कलेचे माझे ज्ञान परिपूर्ण झालं असं मी समजत नाही. भरपूर ज्ञान प्राप्त करुन घेतलं असलं तरी माणसाचं मन स्वत:च्याबद्दल साशंक असतं. विद्वान व्यक्तींच्या कसोटीत उतरल्यावरच मनुष्य स्वत:च्या ज्ञानाबद्दल समाधानी होतो. म्हणूनच

उपदेशं विदु: शुध्दं सन्तस्तमुपदेशिन: ।
श्यामायते न युष्मासु य: काञ्चनमिवाग्निषु ।। मालविका. २/९

असे कालिदास म्हणतो.

- "उत्कृष्ठ शिक्षक त्याच शिकवणीला शुध्द समजतात कीं, जी अग्नीत सोन्याप्रमाणे तुमच्या सारख्यांच्यापुढे काळवंडत नाही."

याचा अर्थच असा कीं, अभ्यास पूर्ण झाल्याशिवाय विद्यार्थ्यांनी परीक्षेस बसणे अयोग्य होय. अभ्यास न करतां किंवा अर्धवट झाला असतां परीक्षेस बसणारा विद्यार्थी हा परीक्षेत टिकाव धरु शकत नाही. त्याची विद्या ही अशावेळी काळवंडून जाते. पण जो विद्यार्थी सतत अभ्यास करुन आणि केवळ घोकंपट्टी न करतां योग्य पध्दतीने [त्याचा अभ्यास करुन] ती विद्या ग्रहण करतो व नंतर परीक्षेस बसतो त्याची विद्या कधीही काळवंडत नाही, आणि कोणत्याही अवघड कसोटीत तो उत्तीर्ण झाल्याशिवाय राहात नाही. अभ्यास म्हणजे पुन:पुन्हा सातत्याने करण्याचा प्रयत्न. आणि विद्या ही अशा पध्दतीने विद्यार्थ्यांनी ग्रहण करावी असा उपदेश कालिदासाने रघुवंशात केला आहे. तो तेथे म्हणतो -

"विद्यामभ्यसनेनेव प्रसादयितुमर्हसि" [रघु. १.८८]

- "विद्येला अभ्यासाने प्रसन्न करणे योग्य होय". म्हणजे ती सहजसाध्य नसून त्यासाठी प्रयत्नांची आवश्यकता आहे. आणि अशा रीतिने प्रयत्न-पूर्वक मिळविलेली विद्या, विद्यार्थ्यांच्या मनांत खोलवर रुजल्यावरच त्याने परीक्षेला बसावे. ही गोष्ट विद्यार्थी आणि शिक्षक या दोघांच्याही दृष्टीकोनातून हितावह आहे. विद्यार्थ्यांच्या दृष्टीकोनातून विचार करतां अशा न रुजलेल्या शिकवणीचे प्रदर्शन त्याच्या अपयशाला कारणीभूत होते. तसेच नशिबाने तो त्या परीक्षेत यशस्वी ठरला तरी ते अपूर्ण ज्ञान भावी काळांत त्याला उपयोगी पडत नाही व शिक्षकांच्या दृष्टीकोनातून विचार करतां, अशा विद्यार्थ्यांचे अपयश हे शिक्षकाच्या यशाला कलंकित करते.

त्यामुळे शिक्षण ही इतकी सहजसाध्य गोष्ट नाही. त्यासाठी शिक्षक आणि विद्यार्थी या दोघांचीही कसोटी लागते. दोघेही सारखेच कष्टाळू, प्रामाणिक, जिज्ञासू, निष्ठावान, बुध्दिमान आणि तळमळीचे असतील तर दोघांचे श्रम सार्थकी लागतात असेच कालिदासाला या सर्व विचारांवरून स्पष्ट करावयाचे आहे. खरोखर आज समाजाला अशा शिक्षकांची आणि अशा विद्यार्थ्यांची गरज आहे. समाजाची झालेली दुरवस्था पाहतां ही गोष्ट अत्यंत तीव्रतेने जाणवते. अलिकडच्या काळांत शिक्षक-विद्यार्थ्यांचे नाते पार बदलून गेले आहे. विद्यार्थ्याला आपल्या शिक्षकांच्याबद्दल आदर राहिला नाही, आणि विद्यार्थ्यांबद्दल शिक्षकाला आत्मीयता वाटत नाही. शिक्षक हा फक्त पोटभरू तर विद्यार्थी हा परीक्षार्थी झाला आहे. म्हणून कालिदासाने अपेक्षिलेल्या शिक्षक आणि विद्यार्थ्यांची आज समाजाला गरज आहे.

कालिदासाने "मालविकाग्निमित्रम्" या नाटकांत गणदास आणि हरदत्त यांच्या संवादाद्वारा शिक्षणासंबंधीचे आपले विचार व्यक्त केले आहेत. यामध्ये असाही एक विचार आला आहे की, चित्रकर्म, नृत्य, गीत इ. प्रयोगप्रधान कला किंवा विद्या आहेत, त्यांचे केवळ पुस्तकी शिक्षण पुरे होत

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

नसून प्रत्यक्ष प्रयोग पाहून परीक्षकांनी विद्यार्थ्यांची लायकी ठरवली पाहिजे. [कालिदास - कालिदासीय विचार [शिक्षण] - प्रकरण ८- पान नं. २८४]
याबाबतीत गणदास आणि हरदत्त जेव्हां परस्परांमध्ये भांडण करतच दरबारात येतात व न्यायाधीश असणाऱ्या भगवतींना आपल्या गुणदोषांची छाननी करण्यास सांगतात, तेव्हा राजा त्या दोघांनाही लगेच वादाला सुरवात करण्यास सांगतो. परंतु परिव्राजिका त्यांना थांबवते आणि म्हणते कीं, -
देव, प्रयोगप्रधानं हि नाटयशास्त्रम् । किमत्र वाग्व्यवहारेण ।
- म्हणजे"महाराज, नाटयशास्त्र हे तर प्रयोगप्रधान आहे. त्यांत शाब्दिक चर्चेचा काय उपयोग ?" यामध्ये कालिदासाला हेच सांगावयाचे आहे कीं, कांही विद्या या प्रयोगप्रधान असतात, तेव्हां नुसत्या लेखी अथवा तोंडी परीक्षेऐवजी त्यांचे प्रात्यक्षिक पाहणेच जास्त योग्य ठरते.

शिक्षक आणि विद्यार्थी यांच्या यशापयशाचे मोजमाप करणारी न्यायाधीश व्यक्ती कशी असावी याचाही विचार करावयास कालिदास विसरलेला नाही. कालिदासाची नजर अत्यंत सूक्ष्म आहे, आणि त्याच्या नजरेतून कोणतीही गोष्ट सुटत नाही, हेच यातून आपल्याला दिसते. या न्यायाधीशाच्या बाबतीत एक महत्त्वाची सूचना कालिदास देतो. ती म्हणजे

"सर्वज्ञस्याप्येकाकिनो निर्णयाभ्युपगमो दोषाय । मालविका. १
[परिव्राजिका]

- "सर्वज्ञाने देखील एकटयाने निर्णय देण्याची योजना सदोष होय".

म्हणजे न्यायाधीश [परीक्षक] कितीही विद्वान असो पण त्याचा निर्णय हा सर्वथा निर्दोष असतोच असे कांही निश्चितपणे म्हणता येत नाही. त्यानी दिलेला निर्णय हा कदाचित् एखाद्या विद्यार्थ्यावर वा व्यक्तीवर अन्यायकारक असूं शकेल. त्याच्या पसंतीला न उतरलेली एखादी गोष्ट दुसऱ्या एखाद्या व्यक्तीच्या पसंतीला उतरू शकेल. म्हणून हा सर्व विचार

करून याचे सार कालिदासाने वरील एकाच वाक्यात सांगितले आहे. त्याचा अर्थच असा कीं, एकापेक्षा अधिक व्यक्ती [२ किंवा ३] निर्णय देण्यासाठी परीक्षक म्हणून नेमणे योग्य होय. कारण बहुमताने एखादी गोष्ट ठरली असतां ती कमी अन्यायकारक होते. आजही कोणत्याही स्पर्धेसाठी २ किंवा ३ परीक्षक नेमतात ते याच उद्देशाने होय. एखाद्या गोष्टीसाठीं सर्वोच्च न्यायालयापर्यंत मनुष्य धाव घेतो ते एवढ्याचसाठी. म्हणजे एका न्यायालयात न्याय मिळाला नाही तर कदाचित् वरच्या न्यायालयात तो मिळू शकेल.

दोन हजार वर्षापूर्वी कालिदासाने सर्वच गोष्टींचा किती दूरगामी विचार केला होता, आणि त्याचे विचार किती परिपूर्ण होते हेच आपल्याला त्याच्या प्रत्येक मतासून दिसून येते. "तत्त्वज्ञ" म्हणून आपण त्याला म्हणतो ते एवढ्यासाठीच. प्रत्येक बाबतीतील त्याची ही "सत्यशोधक वृत्ती" हेच त्याच्या लोकप्रियतेचे गमक होय.

या परीक्षकांच्या बाबतीत आणखी एक सूचना कालिदासाने देऊन ठेवली आहे, आणि ती ही अत्यंत महत्त्वाची आहे. ती सूचना म्हणजे परीक्षक हा "तटस्थ" असावा. म्हणजे तो "निःपक्ष" असावा. गणदास आणि हरदत्त या दोघांच्याही विद्येची परीक्षा घेण्यासाठी न्यायाधीश म्हणून राजा अग्निमित्र परिव्राजिकेला बोलावतो आणि तिलाच न्यायाधीश नेमण्याचे कारण तो सांगतो कीं, मी आणि देवी या दोघांचे पक्षपाती आहेत. म्हणजे आम्ही त्या दोघांच्या परीक्षेचा निकाल देण्यास अपात्र आहोत. यावर दोघे आचार्य उत्तरतात कीं, "सम्यगाह देव: । मध्यस्था भगवती गुणदोषौ न: परिछेत्तुमर्हति ।" मालविका, १

– म्हणजे "महाराज उचितच बोलले. तटस्थ असलेल्या भगवतींनी आमच्या गुणदोषांची छाननी करणें योग्य होय." यावरून परीक्षक हा मध्यस्थ म्हणजे निःपक्षपातीपणाने न्याय देणारा हवा हा ही महत्त्वाचा विचार कालि-

दासाने या नाटकात मांडला आहे. अन्यथा आपल्या पक्षाबद्दल आत्मीयता वाटल्यामुळे दुसऱ्या पक्षावर अन्याय होण्याची शक्यता संभवते.

अशा रीतीने शिक्षक, विद्यार्थी, न्यायाधीश इ. बाबतची आपली मते स्पष्ट केल्यावर कालिदास शिक्षणाबद्दलचा उद्देश सांगावयासही विसरला नाही. तो म्हणतो

सम्यगाराधिता विद्या प्रबोधविनयाविव । रघु. सर्ग १०/७१

– "चांगल्या रीतीने अभ्यासलेली विद्या ज्याप्रमाणे शहाणपण व विनय यांना जन्म देते". म्हणजेच कालिदासाच्या मते शिक्षण हे फक्त माणसाला सुशिक्षित बनवत नाही तर सुसंस्कारित बनवते. ते माणसाला उद्दट बनवत नाही तर विनयी बनवते, माणसाला वाममार्गाला नेत नाही तर ते शहाणपण शिकवते. स्वावलंबी बनवते, चांगल्या वाईटाची पारख करण्याचे ज्ञान त्याला देते. त्याची विवेकबुध्दि जागृत करते. तेव्हां अशा प्रकारचे सुसंस्कारित बनवणारे शिक्षण विद्यार्थ्यांना दिले गेले पाहिजे. असेच त्याला वरील वाक्यातून सूचित करावयाचे आहे.

अशा रीतीने सुमारे २००० वर्षापूर्वी कालिदासाने मांडलेली शिक्षणाविषयीची मते आजही उद्बोधक असून ती मननीय आहेत आणि व्यक्तींना विचार करावयास लावणारी आहेत. शिक्षणाच्या सर्व घटकांचा अभ्यास त्याने पध्दतशीरपणे केला असून त्याबाबतची त्याची मते अचूक आहेत. ती त्या त्या घटकाचे "तत्त्व" प्रतिपादित करणारी आहेत. याही बाबतीत त्याला "तत्त्वज्ञ" म्हणणे योग्य ठरेल.